-: प्रेसनोट दिनांक - ०७/०६/२०१९ :-

आरोपी लोकसेवक राजाराम धोंडीराम पावसकर, वय-४३, पोलीस नाईक ब.नं.५२८, वडगांव पोलीस ठाणे, जि.कोल्हापूर वर्ग-३ यांनी लाच रक्कम स्विकारले नंतर त्यांना रंगेहात पकडलेबाबत.

---

तक्रारदार व त्यांचे भाऊ यांच्या मध्यें भादोले गावातील शेताच्या हद्दीवरुन वाद सुरु आहेत. त्याबाबत तक्रारदार यांचे भावाने तक्रारदार व त्यांचे मुलांविरुध्द वडगांव पोलीस ठाणे येथे अदखलपात्र तक्रार दिलेली होती. सदर तक्रारीचा तपास वडगांव पोलीस ठाणेचे बिट अंमलदार श्री.पावसकर यांचेकडे होता. सदर तक्रारीच्या अनुशंगाने तक्रारदार यांनी बिट अंमलदार श्री.पावसकर यांची वडगांव पोलीस ठाणे येथे भेट घेतली असता, तक्रारदार यांना तुमच्या विरुध्द गुन्हा दाखल होवून त्यामध्ये तुम्हाला शिक्षा होईल अशी भिती घालून सदर प्रकरणामध्ये कारवाई न करण्यासाठी तक्रारदार यांचेकडे १०,०००/- रुपये लाचेची मागणी केली होती.

त्याबाबत तक्रारदार यांनी दिनांक ०६/०६/२०१९ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर या कार्यालयाकडे वडगाव पोलीस ठाणेकडील बिट अमलदार श्री.पावसकर यांचेविरुध्द तक्रारी अर्ज दिलेला होता.

तक्रारदार यांचे तक्रारीप्रमाणे दिनांक ०६/०६/२०१९ रोजी शासकीय पंच साक्षीदार यांचे समक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, पडताळणी मध्ये बिट अमलदार श्री.पावसकर यांनी तक्रारदार यांचेकडे सदर गुन्हयामध्ये मदत करण्यासाठी तडजोडी अंती ५,०००/- लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्याप्रमाणे आज दिनांक ०७/०६/२०१९ रोजी बिट अंमलदार श्री.पावसकर यांचेविरुध्द वडगाव एस. टि. स्टॅन्ड येथे सापळयाचे आयोजन केले असता, बिट अंमलदार श्री.पावसकर यांनी तक्रारदार यांचेकडून वडगांव एस.टि.स्टॅन्ड परिसरात पंच साक्षीदार यांचे समक्ष ५,०००/- रुपये लाच रक्कम स्विकारली असता त्यांना रंगेहात पकडणेत आले असून त्यांच्याविरुध्द वडगांव पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करणेची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई श्री.संदिप दिवाण पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे व श्रीमती सुषमा चव्हाण, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री.गिरीष गोडे, पोलीस उपअधीक्षक, हे.कॉ.श्री.मनोज खोत,पोलीस कॉन्स्टेबल कृष्णात पाटील,संग्राम पाटील, मयुर देसाई, रुपेश माने,चालक अपराध ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की, लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तक्रारी असल्यास लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.

१) मा.महासंचालक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग,म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१

२) मा.पोलीस अधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे
दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३

३) श्री.गिरीष गोडे , पोलीस उपअधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, कोल्हापूर ८१०८६६०७०७ ०२३१/२५४०९८९.

४) हेल्पलाईन टोल फ्री कमांक :- १०६४.

५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३

~~इ. पवार~~ प्र. कि - शेलार ब. नं. ५६४

पी. डी पाटील २५१९